| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**<br>**विभागीय मंडळ, पुणे.४११००५**<br>**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005** | |

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


**महत्वाचे**

क्र.पु.वि.मं./शाखा-डीपी./ 7630
पुणे. 411005.
दि. 17/09/2025

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

**विषय :- इ. १० वी व इ. १२ वी मंडळ मान्यता (सांकेतांक क्रमांक) देण्याची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत.**
**संदर्भ :- राज्य मंडळाचे क्र.रा.मं/परीक्षा-३/३०७२ दि. ०४.०९.२०२५ रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयाबाबत आपणास सूचित करण्यात येते की, राज्य मंडळाच्या संदर्भिय पत्रान्वये माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळाची प्रथम मान्यता देण्याची प्रक्रिया दिनांक ०५.०९.२०२५ पासून मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आली आहे.

यासाठी माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाची प्रथम मान्यता घेण्यासाठी संबधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक / उच्च माध्यमिक) यांचेकडे प्रचलित पध्दतीने (Offline) प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक / उच्च माध्यमिक) / यांचेकडून शिफारस प्राप्त झाल्यानंतर माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरुन विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे Online पध्दतीने प्रस्ताव सादर करावयाचा असून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने शिफारशीसह Online पध्दतीने प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करावयाचा आहे.

या संदर्भात माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीचा तपशील या पत्रासोबत जोडलेला आहे.

**(कैलास दातखीळ),**
**विभागीय सचिव,**
**महा. राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे-05.**

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव -

1) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
2) शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जि.प. पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.